## प्रकरण ६ वे.

## शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक कार्य.


६. १ प्रस्तावना.

६. २ बापूजी साळुंखे यांचे माध्यमिक शिक्षण प्रसार कार्य.

६. ३ बापूजी साळुंखे यांचे उच्च शिक्षण प्रसार कार्य.

६. ४ बापूजी साळुंखे यांचे तंत्र शिक्षण प्रसार कार्य.

६. ५ बापूजी साळुंखे यांचे स्त्री शिक्षण प्रसार कार्य.

६. ६ बापूजी साळुंखे यांचे शिक्षक प्रशिक्षण प्रसार कार्य.

६. ७ बापूजी साळुंखे यांचे वसतिगृहा संबंधीचे कार्य.

६. ८ समारोप.

संदर्भ.


:::::::::::

६.१ प्रस्तावना -

बापूजींचा भूमिगत चळवळी संबंधी कार्य करीत असतांना महाराष्ट्रातील निरनिराळ्या संस्थाचा, संघटनांचा व सामान्य जनतेचा जवळून संबंध आला. बापूजीनी या सर्वांचे निरिक्षण केले. सामान्य जनतेच्या शिक्षणाची गैरसोय त्यांच्या लक्ष्यात आली. रयत शिक्षण संस्थेत नोकरी करीत असतांना नवीन शिक्षणसंस्था स्थापन करण्याचा विचार त्यांच्या मनात घोळू लागला. या विचाराला त्यांच्या सहकारी मित्रानी साथ दिली आणि सन १९५४ मध्ये बापूजीनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत त्यांनी महाराष्ट्रातील १० जिल्हयात विशेषत: ग्रामीण भागात ठिकठिकाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये काढून शिक्षण प्रसाराचे कार्य केले. बापूजींच्या शैक्षणिक कार्याची माहिती त्यांनी स्थापन केलेल्या विविध शाखाना भेटी देवून मिळविली. त्या माहितीच्या आधारे या प्रकरणात बापूजींच्या कार्याचा सारांश रुपाने आढावा घेतला आहे.

## माध्यमिक शिक्षणाची पार्श्वभूमी -

### माध्यमिक शिक्षणाचा अर्थ -

प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर ज्या शिक्षणाची सुरुवात होते त्यास माध्यमिक शिक्षण म्हणतात. माध्यमिक शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना प्राचार्य एम.जी.माळी आपल्या शैक्षणिक प्रश्न पुनर्रचना आणि राष्ट्र विकास या पुस्तकात लिहतात.

"माध्यमिक शिक्षण म्हणजे ११ ते १७ या वयोगटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या मानसिक विकासाच्या गरजानुसार दिले जाणारे सर्व सामान्य, तांत्रिक, व्यवसायिक अगर विशेष शिक्षण होय. "१.

विद्यार्थ्यांवर संस्कार घडविणे त्यांच्या कुमार अवस्थेतच अधिक योग्य ठरते. त्या दृष्टीने माध्यमिक शिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान आहे.

माध्यमिक शिक्षणाचे महत्व -

माध्यमिक शिक्षणाला "संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा कणा" मानले जाते. माध्यमिक शिक्षण कालावधीतच विद्यार्थ्यांना योग्य सवयी लावता येतात. उद्योग, व्यवसाय, संरक्षण इत्यादी राष्ट्रीय जीवनाची अंगे सांभाळण्याची व दृढ करण्याची जबाबदारी माध्यमिक शिक्षण घेणा-या तरुणावरच असते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हेच शिक्षण साहाय्यभूत होते.

महाराष्ट्र सरकारचे माध्यमिक शिक्षणाबाबतचे धोरण -

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्र शासनाने माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर अधिक भर देण्यास सुरवात केली. माध्यमिक शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार होण्यासाठी शासनाने खाजगी शैक्षणिक संस्थांना माध्यमिक शाळा काढण्यास परवानगी देण्याचे धोरण सुरु केले.

६.२ बापूजी साळुंखे यांचे माध्यमिक शिक्षण प्रसार कार्य -

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी माध्यमिक शिक्षण अधिक उपयुक्त आहे. विद्यार्थ्यांवर सुसंस्कार घडविण्यासाठी हाच कालावधी लाभदायक आहे असे ठरवून माध्यमिक शिक्षण प्रसाराकडे बापूजींनी आपले

लक्ष्य केंद्रीत केले.

सहा जून १९५५ रोजी कोल्हापूर येथे जुन्या बुधवार पेठेतील भुसार वाडयात 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज' हे पहिले माध्यमिक विद्यालय सुरु केले. या विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षक ही दोन्ही पदे त्यांनी स्वत: संभाळली या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या राहण्या जेवण्याच्या सोयीसाठी "छत्रपती विद्यार्थी वसतिगृह" सुरु केले. त्याच वर्षी तासगांव येथे रामानंद भारती यांच्या सहकार्याने माध्यमिक विद्यालय सुरु केले. या विद्यालयास तत्कालीन तासगांव नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. रामभाऊ लुगडे यांनी आर्थिक सहाय्य केले. पाटण तालुक्यात चाफळ येथे "श्री समर्थ विद्यामंदीर स्थापन केले" तसेच तारळे या ठिकाणी "छत्रपती विद्यामंदीर सुरु केले. या शाखांच्या आर्थिक साहाय्यार्थ त्यांना ठिकठिकाणी हिंडून लोक वर्गणी जमा करावी लागली. त्यावेळी बापूजींनी "साहित्य शोभा" या पुस्तकाचे संपादन करुन चार हजार रुपये जमा केले. आणि त्याचा उपयोग या माध्यमिक विद्यालयाच्या विकासासाठी केला. या विद्यालयाचे निकाल चांगले लागावेत म्हणून त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली.

वाई येथे उच्च वर्गीयांचे वर्चस्व असल्यामुळे बहुजन समाजाच्या मुलांच्या शिक्षणाची कुचंबणा होत होती. वाईचे नारायणराव चव्हाण व पुण्याचे बाबूराव जगताप यांच्या सहकार्याने वाई येथे सन १९५६ मध्ये "महर्षि शिंदे विद्यामंदीर." या माध्यमिक विद्यालयाची त्यांनी स्थापना केली. सन १९५७ मध्ये श्री. पोतदार गुरुजींच्या सहकार्याने केम येथे 'उत्तरेश्वर विद्यालय' सुरु केले. सन १९५८ मध्ये इचलकरंजी येथे श्री. पी. टी. कणसे यांच्या सहकार्याने 'न्यू इंग्लिश स्कूल' सुरु केले. सन १९५८ मध्ये बापूजींनी सांगली जिल्ह्यात मांजर्डे, नागठाणे, मणेराजूरी, या ठिकाणी माध्यमिक विद्यालये काढून शिक्षणाचा विस्तार केला.


सन १९५८ मध्ये सातारा जिल्ह्यात दौरे काढून माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व लोकांना पटवून दिले. सातारा जिल्ह्यात तळमावले या ठिकाणी काकासाहेब चव्हाण यांच्या सहकार्याने 'वाल्मीकी विद्यालयाची' स्थापना केली. सातारा येथे 'भवानी विद्यामंदिर' हे माध्यमिक विद्यालय सुरु केले. या जिल्ह्यात बापूजींनी १९६० पर्यंत ३१ माध्यमिक विद्यालये काढली. त्यांनी या जिल्ह्यात माध्यमिक शिक्षण प्रसाराबाबत केलेल्या कार्याविषयी प्राध्यापक बी. डी. पाटील आपल्या 'डॉ. बापूजी साळुंखे व्यक्ती आणि कार्य' या पुस्तकात लिहतात.

> बापूजींनी सन १९४२ च्या क्रांतीलढयात भाग घेवून लक्ष्य वेधी पराक्रम तर केलाच पण सातारा जिल्ह्यात सर्वाधिक माध्यमिक शाळांची स्थापना करुन या जिल्ह्यात शैक्षणिक क्रांती घडवून आणली "२.

सातारा जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण प्रसाराबरोबरच सांगली जिल्ह्यात सन १९६१ मध्ये १२ विद्यालये काढली. तसेच पुणे जिल्ह्यात ६ माध्यमिक विद्यालये काढली व कोल्हापूर जिल्ह्यात ८ माध्यमिक विद्यालये काढली. त्यानंतर बापूजींनी आपले लक्ष्य उस्मानाबाद जिल्ह्याकडे वळविले. या जिल्ह्यातील तुळजापूर येथे श्री. रा. गे. शिंदे गुरुजींच्या सहकार्याने 'महर्षी वि. रा. शिंदे' हायस्कूल सुरु केले. तसेच शिक्षणाच्या बाबतीत कोकणातील बहुतांश भाग मागासलेला असल्याने रत्नागिरी जिल्ह्यात सन १९६१ मध्ये १० माध्यमिक विद्यालये, काढली. त्यासाठी डॉ. विश्राम घोले यांचे सहकार्य लाभले. बापूजींच्या या वाढत्या शिक्षण प्रसारकार्यामुळे बहुजन समाजात त्यांच्या विषयी आपुलकीची भावना निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्या शिक्षण प्रसार कार्यास गती मिळाली. सन १९६४ मध्ये रायगड, कोल्हापूर, पुणे जिल्ह्यात त्यांनी आणखी माध्यमिक विद्यालये काढली. सन १९६७ मध्ये बीड जिल्ह्यात २, रायगड जिल्ह्यात ६ विद्यालये काढली अशा प्रकारे

आकृती क्रमांक ७

## श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांची संख्यात्मक वाढ दर्शविणारा आलेख



श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या माध्यमिक विद्यालयाची संख्या वाढतच गेली. बापूजीनी स्थापन केलेल्या माध्यमिक विद्यालयाची संख्या सन १९८७ पर्यंत १४५ झाली.

[ त्याची यादी परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिली आहे. ]

श्री स्वामी विवेकानंद संस्थेच्या माध्यमिक विद्यालयांची
संख्यात्मक वाढ.

**कोष्टक** क्र. ६. १.

| अ. नं. | वर्ष | | माध्यमिक विद्यालयांची वाढ. |
|---|---|---|---|
| १. | १९५५ | – | ४ |
| २. | १९६० | – | ७५ |
| ३. | १९६५ | – | १२० |
| ४. | १९७० | – | १३५ |
| ५. | १९७५ | – | १३५ |
| ६. | १९८० | – | १३५ |
| ७. | १९८५ | – | १४५ |

उच्च माध्यमिक शिक्षण प्रसार कार्य -

१०+२+३ या नवीन शैक्षणिक आकृतीबंधानुसार महाराष्ट्र शासनाने डॉ. ए. यू. शेख यांना उच्च माध्यमिक शिक्षण समितीचे अध्यक्ष नेमले त्यांच्या शिफारशीनुसार १९७५ पासून माध्यमिक विद्यालयाना व कांही ठिकाणी महाविद्यालयांना ११ वी १२ वीचे वर्ग जोडावे या धोरणाचा स्विकार झाला. बापूजीनी या शासकीय धोरणास प्रतिसाद देण्यासाठी माध्यमिक विद्यालयाना सलग्न अशा उच्च माध्यमिक वर्गाची सुरवात सन १९७६ पासून केली. पहिली दोन वर्षे ही उच्च माध्यमिक विद्यालये विना अनुदान तत्वावर असल्याने बापूजीनी माध्यमिक विद्यालयातील अनुभवी शिक्षका कडून ११ वी १२ वी चे वर्ग चालविले. माध्यमिक विद्यालयासाठी लागणा-या सर्व सुविधा या उच्चमाध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना निर्माण करुन दिल्या.

बापूजीनी सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, रायगड या जिल्हयातील माध्यमिक विद्यालयाना सलग्न असलेली एकंदर ३०उच्च माध्यमिक विद्यालये स्थापन केली. [ त्यांची यादी परिशिष्ट क्र. ६ मध्ये दिली आहे. ]

बापूजीनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न.

१] ग्रामीण भागात खेडोपाडी हिंडून जनसंपर्क वाढविला. तेथील ग्रामस्थाना माध्यमिक शिक्षणाचे महत्व पटवून दिले.

२] गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गैरसोयी दूर करण्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृहे काढली. वसतिगृहातून निरनिराळ्या योजना राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले.

३] माध्यमिक विद्यालयाच्या इमारत बांधणीसाठी ठिकठिकाणी दौरे काढून लोक वर्गणी जमा केली.

४] माध्यमिक विद्यालयाच्या मान्यतेसाठी शासनाशी निर्भयपणे तोंड दिले.

५] संस्थेने चालविलेल्या माध्यमिक विद्यालयांच्या शालांत परिक्षेचे निकाल उत्तम लावण्यासाठी वैयक्तीक लक्ष्य दिले.

६] माध्यमिक विद्यालयांच्या योग्य प्रशासनाच्या दृष्टीने संस्थेच्या माध्यमिक विद्यालय शाखांचे ५ विभाग केले.

७] विद्यार्थ्यांमध्ये आदर्श निर्मीती होण्यासाठी माध्यमिक विद्यालयांना थोर पुरूषांची व संतांची नांवे दिली.

८] माध्यमिक विद्यालयांच्या विकासासाठी क्रिडांगणे, ग्रंथालये, शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या.

९] माध्यमिक विद्यालयांच्या प्रगतीसाठी आदर्श, कार्यक्षम व अनुभवी शिक्षकांच्या नेमणूका केल्या.

१०] गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, बक्षीस योजना जाहीर करून शिक्षणाची संधी निर्माण करून दिली.

११] संस्थेच्या माध्यमिक विद्यालयातून निरनिराळ्या सह शालेय कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार घडविण्यासाठी प्रयत्न केले.

<u>उच्च शिक्षणाची पार्श्वभूमी -</u>

<u>उच्च शिक्षणाचा अर्थ -</u>

ज्या शिक्षणातून नवीन ज्ञानाचे शोधन व संवर्धन केले जाते त्यास उच्च शिक्षण म्हणतात -

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या शिक्षणाची सुरवात होते. उच्च शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करताना राधा कृष्णन् आयोगाने लिहले आहे की,

> "राजनीती, प्रशासन, उच्चव्यवसाय, व्यापार उद्योग या क्षेत्राना ज्ञान व नेतृत्व पुरविण्याचे तसेच साहित्य विज्ञान, तंत्रज्ञान या शाखाना विकसीत करण्याचे कार्य ज्या शिक्षणातून होते ते उच्च शिक्षण होय. "३.

यावरून देशाच्या व समाजाच्या अपेक्षित पुनर्रचनेचे नेतृत्व विद्यापीठीय शिक्षणाला करावे लागते हे स्पष्ट होते.

## उच्च शिक्षणाचे महत्व -

राष्ट्रीय जीवनाच्या प्रवाहात समरस होवून आणि अग्रभागी राहून मार्गदर्शन करण्याची जबाबदारी उच्च शिक्षण घेतलेल्या नागरीकांची असते. ज्ञान विज्ञानाचे सतत संशोधन आणि नव्या ज्ञानाची निर्मिती व वितरण ही उच्च शिक्षणाची कार्ये आहेत. उच्च शिक्षणाचे महत्व स्पष्ट करताना डॉ. झाकीर हुसेन आपल्या " भारतातील शैक्षणिक पुनर्रचना " या पुस्तकात असे लिहतात की,

> " जीवनाच्या सर्व क्षेत्रात ज्ञानाचा, सत्याचा अखंड शोध घेण्याचे कार्य आणि मानवी जीवन सुसंस्कृत व समृध्द करण्याचे कार्य विद्यापीठाच्या ज्ञान शाखानी करावयाचे असते म्हणून समाज जीवनाचे स्थान उंचावण्याच्या दृष्टीने उच्च शिक्षणाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. "४

## महाराष्ट्र सरकारचे उच्च शिक्षणाबाबतचे धोरण -

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. राष्ट्र विकास व समृध्द समाज निर्मितीसाठी उच्च शिक्षणाची आवश्यकता असल्याने उच्च शिक्षणास चालना मिळावी म्हणून सन १९६० नंतर खाजगी शैक्षणिक संस्थाना विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालये सुरु करण्यास

परवानगी देण्याचे धोरण स्विकारले. तसेच नवीन विद्यापीठे काढण्याचे धोरण ठरविले. आर्थिक दृष्टया कमकुवत घटकातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ घेता येण्यासाठी फी सवलतीचे धोरण स्विकारले. उच्च शिक्षण सामान्यापर्यंत पोहचले पाहिजे यासाठी शासनाने निरनिराळ्या योजनाद्वारे उच्च शिक्षणास उत्तेजन दिले.

६.३ बापूजी साळुंखे यांचे उच्च शिक्षण प्रसार कार्य -

उच्च शिक्षणाचा राष्ट्र विकासातील सहभाग व महत्व बापूजींनी लक्ष्यात घेतले. तसेच माध्यमिक शिक्षण प्रसाराबरोबर उच्च शिक्षण ही "ज्ञान, विज्ञान, सुसंस्कारासाठी" किती गरजेचे आहे हे ओळखून त्यांनी उच्च शिक्षणप्रसाराकडे आपले लक्ष्य वळविले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अनेक महाविद्यालये काढून उच्च शिक्षणप्रसाराची पार्श्वभूमी तयार केली होती. त्याचा अप्रत्यक्ष परिणाम बापूजींच्या शिक्षणप्रसार कार्यावर झाला. बापूजींनी उच्च शिक्षणाचा प्रारंभ मराठवाडयात केला. उस्मानाबाद हा जिल्हा उच्च शिक्षणाच्या बाबतीत मागासलेला असल्याने बापूजींनी सन १९५८ मध्ये उस्मानाबाद येथे रामकृष्ण परमहंस महाविद्यालय सुरु केले. हे महाविद्यालय सुरु करतांना त्यांना अनेक अडचणीवर मात करावी लागली. मराठवाडयातील ग्रामीण भागात ठिकठिकाणी हिंडून उच्च शिक्षणाचे महत्व त्यानी लोकांना पटवून दिले. मनोरंजनासारखे कार्यक्रम आखून महाविद्यालयासाठी देणग्या जमा केल्या. स्थानिक लोकांच्या वेळी अवेळी बैठका घेतल्या. महाविद्यालयांचा विकास व्हावा म्हणून श्री. रा. कृ. कणबरकर यांची या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून नेमणूक केली. सन १९६० मध्ये भुसावळ, इस्लामपूर, वाई, तासगांव, इचलकरंजी, या ठिकाणी महाविद्यालये काढण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे अर्ज केले परंतु पुणे विद्यापीठाने त्यांना महाविद्यालये

काढण्यास परवानगी दिली नाही. त्यासाठी त्यांना उपोषण ही करावे लागले. त्याचा परिणाम म्हणून स्वामी विवेकानंद संस्थेला इचलकरंजी व तासगांव येथे महाविद्यालये सुरु करण्यास पुणे विद्यापीठाने परवानगी दिली. बापूजींनी सन १९६२ मध्ये तासगांव येथे प्रथम आर्टस आणि कॉमर्स कॉलेज सुरु केले. नंतर शास्त्र शाखेसही परवानगी मिळविली. त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. रा. शा. लुगडे यांनी या महाविद्यालयास नगरपालिके तर्फे २० हजार रुपयांची देणगी दिली. तसेच वसंतदादा पाटील यांनी माधवनगर सहकारी साखर कारखान्यातून १० हजार रुपयांची मदत केली. बापुजींनी सन १९६२ मध्ये इचलकरंजी येथेआर्टस, सायन्स अँण्ड कॉमर्स कालेज सुरु केले. श्री दत्ताजीराव कदम, श्री. पी. टी. कणसे, श्री. बाबासाहेब खंजिरे, इत्यादी स्थानिक व्यक्तींच्या सहकार्याने तेथील लोकांकडून लोकवर्गणी जमा केली. निरनिराळ्या मनोरंजक कार्यक्रमाद्वारे महाविद्यालय इमारतीसाठी फंड जमा केला. तत्कालीन नगराध्यक्ष श्री. आण्णासाहेब निलगार यांनी या महाविद्यालयास ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. डॉ. डी. एन्. सोळंकी हे या महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य झाले. बापूजींनी या महाविद्यालयाच्या विकासासाठी खूप परिश्रम घेतले.

बापूजींनी विवेकानंदाबद्दल खूप आदर होता. त्यांचे चिरंतन स्मारक व्हावे असे बापूजींनी सारखे वाटत होते. त्यासाठी त्यांनी तत्कालीन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या वारंवार भेटी घेवून कोल्हापूर येथे महाविद्यालय काढण्यास परवानगी मिळविली. विवेकानंदाच्या जन्मशताब्दी निमित्त २० जून १९६४ रोजी स्वामी विवेकानंदाच्या नावाने महाविद्यालय सुरु केले. यामध्ये कल्पकता दिसून येते. कोल्हापूरचे त्यावेळचे नगराध्यक्ष श्री. केशवराव जाधव यांना वारंवार भेटून बापूजींनी या महाविद्यालयासाठी २५ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळविली. याशिवाय श्रीमती प्रेमाताई कुलकर्णी, श्री. वाय. पी. पोवार यांच्याकडून १० हजार रुपयाचे आर्थिक सहाय्य मिळविले. या

या महाविद्यालयास क्रीडांगण, ग्रंथालय, प्रयोगशाळा, विद्यार्थी वसतिगृह, रात्रीची अभ्यासिका इत्यादी सोयी उपलब्ध करून देण्यासाठी बापूजींनी अहोरात्र कष्ट घेतले. तसेच महाविद्यालयाचा विकास व्हावा म्हणून अनुभवी, तज्ञ प्राचार्य व प्राध्यापक वर्ग नेमला.

पश्चिम महाराष्ट्रात तासगांव, इचलकरंजी, कोल्हापूर येथे महाविद्यालये काढल्यानंतर, मिरज येथे २१ जून १९६५ रोजी आर्टस अॅण्ड कॉमर्स कॉलेज सुरु केले. या महाविद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्राचे थोर नेते पद्मभूषण वसंतदादा पाटील आपल्या भाषणात म्हणतात -

> " कर्मवीर भाऊराव पाटील यांचेच शिक्षण प्रसाराचे कार्य बापूजी पुढे चालवित आहेत. त्यांच्या शिक्षण प्रसार कार्याने बहुजन समाजाची जागृती होत असून महाराष्ट्राची रचनात्मक उभारणी केली जात आहे. "५.

मिरजचे शिक्षण प्रेमी अप्पासाहेब मराठे यांच्या सहकार्याने तेथील स्थानिक लोकांकडून बापूजींनी १० हजार रुपयांची मदत मिळविली. तसेच मिरज नगरपालिकेने २५ हजार रुपयाचे आर्थिक साहाय्य केले. या महाविद्यालयाच्या इमारती साठी जमीन मिळवताना बापूजींना फार कष्ट सोसावे लागले. बापूजींचे उच्च शिक्षण प्रसाराचे कार्य वर्षानुवर्षे प्रगतीपथावर चालू झाले. मिरज महाविद्यालयानंतर सातारा येथे बापूजींनी महाविद्यालय काढण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यांनी अप्पासाहेब पवारांची वारंवार भेट घेवून सातारा येथे महाविद्यालय काढण्यास परवानगी मिळविली. लाल बाहादूर शास्त्रीजींच्या पत्नी ललीतादेवी यांच्या हस्ते व भारताचे त्यावेळचे गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली या महाविद्यालयाचे उद्घाटन झाले. त्या प्रसंगी यशवंतराव चव्हाण बापूजींच्या कार्याविषयी म्हणतात.

> " आपले सारे आयुष्य शिक्षणासारख्या पवित्र कार्याला वाहणारे आणि त्यामध्ये यशस्वीता प्राप्त करणारे बापूजी साळुंखे थोर समाज सेवक आहेत. "६.

खेडयापाडयातील जनतेला ही उच्च शिक्षणाचा लाभ झाला पाहिजे. या उद्देशाने बापूजींनी सातारा जिल्ह्यातील तळमावले व सांगली जिल्ह्यातील जत या ठिकाणी महाविद्यालये सुरु केली. अशा प्रकारे बापूजींच्या उच्च शिक्षण प्रसारकार्याचा विस्तार वाढतच गेला. सन १९८४ मध्ये स्वामी विवेकानंद संस्थेने कापशी, कडेपूर लोणी काळभोर, पेण, कराड इत्यादी ठिकाणी विना अनुदान तत्वावर महाविद्यालये सुरु केली. बापूजीनी कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे, उस्मानाबाद, रायगड या जिल्हयात एकंदर १५ महाविद्यालये काढली. [ त्यांनी स्थापन केलेल्या महाविद्यालयाची यादी परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिली आहे. ]

<u>बापूजीनी उच्च शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न -</u>

१] उच्च शिक्षणाचे महत्व व वाढती गरज पटवून देण्यासाठी बापूजीनी ठिकठिकाणी दौरे काढले.

२] उच्च शिक्षण प्रसारासाठी एकंदर १५ महाविद्यालये काढली व त्यातून कला, वाणिज्य, शास्त्र या शाखांच्या पदवी अभ्यासाची व कांही ठिकाणी पदव्युत्तर शिक्षणाची सोय केली.

३] महाविद्यालय मान्यतेसाठी विद्यापीठातील मान्यवर व्यक्तींच्या वारंवार भेटी घेतल्या महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी प्रसंगी उपोषणे केली.

४] मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात ठिकठिकाणी हिंडून महाविद्यालयाच्या विकासासाठी देणग्या जमा केल्या.

५] विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने कांही महाविद्यालयाच्या इमारती बांधल्या.

६] महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून आदर्श मेहनती, कार्यक्षम शिक्षक नेमले.

७] आपल्या विचाराचे मेहनती, त्यागी कार्यकर्ते निर्माण केले व त्यांच्या कडून महाविद्यालयाचा विकास घडविण्यासाठी प्रयत्न केले.

८] महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना निरनिराळ्या बक्षिस योजना जाहीर करून महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले.

९] कांही महाविद्यालयातून गरीब व होतकरु विद्यार्थ्यांसाठी "कमवा व शिका" पुस्तक पेढी या सारख्या योजना राबवून उच्च शिक्षण घेण्याची संधी निर्माण करुन दिली.

## तंत्र शिक्षणाची पार्श्वभूमी -

### तंत्र शिक्षणाचे महत्व -

आजच्या तरुणाची बेकारी नष्ट करण्यासाठी तंत्र शिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. देशाचे उत्पादन वाढविणे व राष्ट्र विकासात भर घालणे या दृष्टीने तंत्र शिक्षणाची फार आवश्यकता आहे. तंत्र शिक्षणाचे महत्व विशद करतांना मुदलियार अयोगाने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की,

> " देशाची सर्वात मोठी संपत्ती जमीनीच्या पोटात सापडत नसून ती लोकांच्या हुशारीत व कौशल्यात सामावलेली असते. "७,

तंत्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार मिळण्यास मदत होते. शिक्षणा-बद्दलची उदासीनता कमी होते. राष्ट्रविकासाला गती मिळते.

### महाराष्ट्र शासनाचे तंत्रशिक्षण प्रसाराबाबतचे धोरण -

आधुनिक जगात तंत्र शिक्षणाने झालेली प्रगती, वाढत्या उद्योग धंद्यामध्ये कुशल तंत्रज्ञानाची गरज यामुळे तंत्र शिक्षणाची आवश्यकता शासनास प्रकर्षाने जाणवू लागली. तंत्रशिक्षण प्रसारास प्रोत्साहन देण्याचे शासनाने ठरविले. त्यासाठी शासनाने कांही तंत्रविद्यालये व अभियांत्रिकी महाविद्यालये काढली. शासनाने तंत्र शाळांना ताबडतोब अनुदान देण्याचे धोरण स्विकारले.

### ६.४ बापूजी साळुंखे यांचे तंत्र शिक्षण प्रसार कार्य -

'तंत्र शिक्षण हा राष्ट्र विकासातील महत्वाचा घटक आहे' असे

बापूजींचे मत होते. तंत्रशिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे औद्योगिक व तांत्रिक क्षेत्राना कुशल प्रशिक्षित, मनुष्यबळाचा पुरवठा करता येईल. तांत्रिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची शारीरिक श्रम करण्याची क्षमता वाढेल. असे बापूजींना वाटल्याने त्यांनी तंत्र शिक्षण प्रसाराकडे लक्ष्य वळविले. सन १९५९ मध्ये बापूजींनी इचलकरंजी येथे 'न्यू इंग्लिश टेक्निकल स्कूल'ची स्थापना केली. त्यानंतर सन १९६१ मध्ये त्यांनी सासवड येथे 'पुरंदर टेक्निकल हायस्कूल' सुरु केले. बापूजींनी तंत्रशिक्षणाचे महत्व पटवून दिले. त्यामुळे तंत्र शिक्षण प्रसारास गती मिळाली. सन १९६२ मध्ये बापूजींनी पारगांव, तासगांव, लोणी, काळभोर येथे तंत्र विद्यालये काढली. सन १९८४ मध्ये पाटण येथे पॉलिटेक्निक सुरु केले. [बापूजींनी सुरु केलेल्या तंत्र विद्यालयाची यादी परिशिष्ट ६ मध्ये दिली आहे. ]

## बापूजींनी तंत्रशिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न -

१] बापूजींनी तंत्र शिक्षणाचे महत्व पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांना तंत्र-शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले.

२] तंत्र क्षेत्रात प्रशिक्षित शिक्षकांच्या टंचाईचा प्रश्न असल्याने तो मिळ-विण्यासाठी तत्सम उच्च संस्थाशी संपर्क वाढविला.

३] स्वतंत्र तंत्र प्रयोगशाळा निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त फंडाची गुंतवणूक केली.

४] कुशल प्रशिक्षित कर्मचारी नेमले.

५] गरीब होतकरु विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य केले.

६] तांत्रिक शिक्षणाचा विकास व्हावा म्हणून तंत्रविद्यालयात निरनिराळ्या सोयी केल्या.

७] तंत्र शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

स्त्री शिक्षणाचे महत्व -

बालकांच्या विकासात मातेचे संस्कार महत्वाचे असतात. स्त्री ही समाजसुधारणेचा मुलाधार आहे. त्यासाठी समाज सुधारावयाचा असेल तर स्त्री शिक्षणाची आवश्यकता आहे. सौ. लिला पाटील 'आजचे शिक्षण आजच्या समस्या' या पुस्तकात कोठारी आयोगाने सांगितलेल्या स्त्री शिक्षणाचे महत्व या संदर्भात लिहतात की,

> " आपल्या मानवी साधन संपत्तीच्या संपूर्ण विकासासाठी, गृहसुधारणेसाठी आणि बाल्यावस्थेच्या अत्यंत संस्कारक्षम, वयात मुलांच्या चारित्र्याची योग्य घडण करण्यासाठी स्त्रीला दिले जाणारे शिक्षण हे फार महत्वाचे आहे. "८.

समाजाचा एक महत्वाचा घटक म्हणून कांही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. लोकशाही मध्ये तर स्त्री शिक्षणाला महत्वाचे स्थान आहे.

महाराष्ट्र शासनाचे स्त्री शिक्षणाबाबतचे धोरण :-

प्राथमिक, माध्यमिक, व उच्च शिक्षण या स्तरावर मुलींसाठी स्वतंत्र शाळाची सोय करून अशा शाळांना ताबडतोब अनुदान देण्याचे शासनाचे धोरण आहे. मुलींच्या शिक्षणास चालना मिळावी म्हणून तालुका पातळीवर सरकार वसतिगृहे काढीत आहे. प्राथमिक, माध्यमिक स्तरावर मुलींना शिक्षण फी माफ केली आहे. महाविद्यालयीन शिक्षणात मुलींची शिक्षण फी माफ करण्याबाबत शासनाचा विचार चालू आहे. वैद्यकीय, आभियांत्रिकी पदवी शिक्षणाच्या प्रवेशासाठी शासनाने मुलींसाठी राखीव जागा ठेवल्या आहेत. स्त्री शिक्षणास उत्तेजन मिळावे म्हणून नोकर भरतीच्या वेळी स्त्रीयांना प्राधान्य देण्याचे धोरण आहे. मुलींची शालेय उपस्थिती वाढण्यासाठी शिष्यवृत्या, निरनिराळ्या बक्षीस योजना शासन जाहीर करीत आहे. गृहशास्त्र, कार्यानुभव यासारख्या व्यावसायिक विषयांच्या अभ्यासक्रमाची सोय शाळा महाविद्यालयातून सुरु करण्यास शासन उत्तेजन देत आहे.

## ६.५ बापूजींचे स्त्री शिक्षण प्रसार कार्य -

### बापूजींचा स्त्री शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन -

मातेच्या ममतेतून मुलावर संस्कार घडविणे फलदायी ठरतात हे ओळखून बापूजींनी स्त्री शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केली. स्त्रीयांना सामाजिक दर्जा मिळाला पाहिजे असे बापूजींचे मत होते. 'पुरुषाप्रमाणे सर्व क्षेत्रात काम करण्याची स्त्रीयांना संधी मिळाली पाहिजे' या धोरणाचा बापूजींनी पाठपुरावा केला. स्त्री शिक्षणप्रसार अधिक झाला तर समाजाची सुधारणा होईल व पर्यायाने राष्ट्र विकासास हातभार लागेल. अशी बापूजींची धारणा होती. स्त्रीयांचे साक्षरता प्रमाण वाढावे म्हणून त्यांनी स्त्री शिक्षण प्रसारावर अधिक भर दिला.

महात्मा फुले, आण्णासाहेब कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्त्री शिक्षणाबाबत केलेल्या कार्यापासून बापूजींना प्रेरणा मिळाली. बापूजींनी सन १९५५ मध्ये कराड येथे मुलींच्या प्रशिक्षणाची सोय व्हावी म्हणून 'कमला नेहरु अध्यापिका विद्यालय' सुरु केले. श्री. बंडो गोपाळ मुकादम, श्री. आप्पासाहेब सिंहासने, श्री. पी. डी. पाटील यांच्या सहकार्याने या भागात अनेक दौरे काढून स्त्री शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून दिले. सुरुवातीस हे अध्यापक विद्यालय चालविण्यास अनेक अडचणी आल्या. सन १९६० मध्ये बापूजींनी इचलकरंजी येथे मुलींचे हायस्कूल सुरु केले तेथील श्री. पी. टी. कणसे, श्री. रामचंद्र जगताप इत्यादी व्यक्तींच्या सहकार्याने त्यांनी या हायस्कूलचा विकास घडविण्यासाठी प्रयत्न केले. मुलींसाठी बापूजींनी येथे महात्मा गांधी वसतिगृह सुरु केले. सन १९६० मध्ये सातारा येथे आपल्या पत्नीच्या नावाने "सुशिला देवी गर्ल्स हायस्कूल" या विद्यालयाची स्थापना केली. सुरुवातीस या गर्ल्स

हायस्कूलचे वर्ग भवानी विद्यामंदिर मध्ये चालत होते. परंतु पुढे बापूजींनी मुलींच्या स्वतंत्र शाळेच्या इमारतीचा विचार करून सन १९६५ मध्ये या गर्ल्स हायस्कूलच्या इमारतीचे उद्घाटन डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या हस्ते केले. डॉ. आप्पासाहेब पवारांनी बापूजींच्या स्त्री शिक्षण प्रसाराविषयी काढलेल्या गौरव उदगारासंबंधी डॉ. गजानन सुर्वे लिहतात.

> " बापूजींनी स्त्री शिक्षण क्षेत्रात उचलेले पाऊल म्हणजे राष्ट्र उभारणीचे द्योतक आहे. त्यांचा त्याग, कर्तव्यनिष्ठा म्हणजे सत्वशील मार्गाचे प्रतीक आहे. "६

बापूजींनी या हायस्कूलमध्ये मुलींसाठी सर्व सोयी उपलब्ध केल्या येथे मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना केली. या ठिकाणी मुलींच्या शिक्षणास उत्तेजन मिळावे म्हणून बापूजींनी गरीब मुलींना आर्थिक साहाय्य केले. त्यांना शिष्य-वृत्या मिळवून दिल्या. सन १९८४ पासून स्वामी विवेकानंद संस्थेने , वाई, भोर, कुंभोज, सासवड येथे मुलींसाठी स्वतंत्र विद्यालये सुरु केली. तसेच काळाची वाढती गरज लक्ष्यात घेवून इचलकरंजी येथे सन १९८४ पासून कन्या महाविद्यालय सुरु केले. सन १९८४ पासून तासगांव येथे विना अनुदान तत्वावर महिला शिक्षण महाविद्यालय सुरु केले. मुलींच्या शिक्षणास प्रेरणा मिळावी म्हणून त्यांनी मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे काढली. अशा वसतिगृहाना बापूजी वारंवार भेटी देत. मुलींना सहानुभूतीपूर्वक व आदराची वागणूक मिळते की नाही याबाबतची काळजी घेत. बापूजींनी स्थापन केलेल्या मुलींच्या शाळा व महाविद्यालये दाखवणारा तक्ता पुढील प्रमाणे दिला आहे.

बापूजीनी स्थापन केलेल्या मुलींच्या शाळा व महाविद्यालये -

कोष्टक क्रमांक- ६.२

| अ.नं. | शाखेचे नांव. | स्थापना सन | मुलींची संख्या |
|---|---|---|---|
| १. | गर्ल्स हायस्कूल इचलकरंजी | १९६० | १२९६ |
| २. | गर्ल्स हायस्कूल, गडहिंग्लज | १९६० | ९४८ |
| ३. | सुशिलादेवी साळुंखे गर्ल्स हायस्कूल, सातारा. | १९६० | ७३३ |
| ४. | गर्ल्स हायस्कूल वाई [सातारा] | १९८४ | ९० |
| ५. | गर्ल्स हायस्कूल , भोर [ पुणे] | १९८४ | १०० |
| ६. | कन्या प्रशाला सासवड [पुणे] | १९८३ | १८७ |
| ७. | गर्ल्स हायस्कूल, कुंभोज [हातकणंगले] | १९८४ | ८२ |
| ८. | कन्या महाविद्यालय इचलकरंजी | १९८४ | १२२ |
| ९. | कमलानेहरु अध्यापक विद्यालय, कराड. | १९५५ | १६० |
| १०. | महिला शिक्षण महाविद्यालय, तासगांव | १९८४ | ८० |

बापूजीनी स्त्री शिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न.

१] मुलींच्या शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी बापूजी ठिकठिकाणी हिंडले.

२] मुलीसाठी त्यांनी स्वतंत्र माध्यमिक विद्यालये, व महाविद्यालये काढली.

३] गरीब होतकरु मुलीना आर्थिक सहकार्य केले.

४] बापूजीनी घरोघरी हिंडून पालकाच्या मनामध्ये मुलींच्या शिक्षणाबद्दल अनुकूल दृष्टिकोण तयार करण्याचा प्रयत्न केला.

५] बापूजीनी मुलींना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत व अन्य ठिकाणी नोक-या मिळवून दिल्या.

६] मुलींच्या शिक्षणास प्रेरणा मिळावी म्हणून त्यांनी मुलींना आदरांची व सहानुभूतीपूर्वक वागणूक दिली. ७] निरनिराळ्या शैक्षणिक सवलती देवून मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन दिले. ८] कांही शाखातून प्रौढ स्त्री साक्षरता वर्ग चालविण्यास प्रोत्साहन दिले. ९] . मुलींच्या राहण्या जेवण्याची गैरसोय दूर व्हावी म्हणून माफक दरात वसतिगृहे चालविली.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## शिक्षक प्रशिक्षणाची पार्श्वभूमी.

### शिक्षक प्रशिक्षणाचा अर्थ -

आज शिक्षक प्रशिक्षणाकडे व्यापक व संशोधक वृत्तीने पाहिजे जाते. शिक्षक प्रशिक्षणाचा अर्थ स्पष्ट करतांना प्राचार्य डॉ. मा. गो. माळी आपल्या " आधुनिक शिक्षणाच्या समस्या" या पुस्तकात लिहतात.

> " शिक्षक प्रशिक्षण म्हणजे ज्या शिक्षणातून विद्यार्थी शिक्षकास निकोप शैक्षणिक तत्वज्ञानाची बैठक प्राप्त करून घेण्याचे ज्ञान मिळते, कार्यात्मक मानसशास्त्राचे ज्ञान मिळते, गतीमान समाजशास्त्राचे ज्ञान मिळते, तसेच नव्या संशोधनाची ओळख करून घेता येते. विद्यार्थ्यांचे यथायोग्य ज्ञान मिळविण्याचे सामर्थ्य प्राप्त करून घेता येते. "१०.

### शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व -

शिक्षण प्रक्रियेत शिक्षक हा एक महत्वाचा घटक आहे. त्याशिवाय शिक्षणाच्या प्रक्रियेस पूर्णत्वच येवू शकत नाही. शिक्षक प्रशिक्षणाचे महत्व स्पष्ट करताना प्राचार्य ना. वि. पाटणकर आपल्या "नव शिक्षण प्रवाह आणि प्रवृत्ती" या पुस्तकात लिहतात.

> " विद्यार्थ्यांच्या वर्तनात परिवर्तन करावयाचे म्हटल्यास एका संपन्न व्यक्तीमत्वाची दुसऱ्या अपरिपक्व व्यक्तीमत्वावर सातत्याने व समर्थपणे होणारा . परिणाम शिक्षकच करु शकतो त्यासाठी शिक्षक घडवावा लागतो. "११.

वरील उद्दिष्टा संबंधी शिक्षक घडवावयाचा असल्यास शिक्षक प्रशिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षक प्रशिक्षणामुळे विद्यार्थी -शिक्षकास नवीन अध्यापन पध्दतीचे ज्ञान होते व प्रयोगशिलता वाढते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्याच्या दृष्टीने शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे.

त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणाचे आज महत्व वाढत आहे. याच संदर्भात केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने "शिक्षणाचे आव्हान" या पुस्तिकेत शिक्षक प्रशिक्षणाचे विश्लेषण केले आहे की,

" सुयोग्यवृत्ती ,मुल्यांची, ज्ञानाची व कौशल्याची जोपासना विद्यार्थ्यांमध्ये केली गेली पाहिजे स्वाभाविकच हे कार्य करणाऱ्या शिक्षकामध्ये अशा वृत्ती प्रशिक्षणाने निर्माण होतात."१२

बापूजींचा शिक्षक प्रशिक्षणाबाबतचा दृष्टिकोण -

शिक्षणात संस्कार रूजविणे अधिक आगत्याचे आहे. त्या दृष्टीने प्रशिक्षित शिक्षकच यथायोग्य संस्कार निर्माण करण्यास योग्य ठरेल असे बापूजीचे मत होते. शाळेविना खेडे असू नये व,प्रशिक्षित शिक्षकाविना शाळा असू नये असे बापूजीना वाटत होते. शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी शिक्षकांचे अनुकरण करीत असल्यामुळे शिक्षकाचे व्यक्तीमत्व अधिक चांगले होण्यासाठी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची आवश्यकता बापूजीनी प्रतिपादन केली.

६.६ बापूजींचे शिक्षक प्रशिक्षण प्रसार कार्य -

शिक्षकांना अध्यापनाचा दर्जा सुधारता यावा व शिक्षकाकडून विद्यार्थ्यांमध्ये सुसंस्कार निर्माण करता यावेत यासाठी शिक्षकांना प्रथम प्रशिक्षीत करावे या उद्देशाने सन १९५५ मध्ये कराड येथे 'कमला नेहरू अध्यापक विद्यालय' स्थापन केले. श्री. बंडो गोपाळ मुकादम, श्री.पी. डी. पाटील यांच्या सहकार्याने हे अध्यापक विद्यालय सुरु झाले. त्यानंतर मराठवाड्यात प्राथमिक शिक्षकांची वाढती गरज लक्षात घेवून सन १९५९ मध्ये तुळजापूरचे माजी आमदार श्री.साहेबराव हंगरगेकर यांच्या सहकार्याने तुळजापूर येथे अध्यापक विद्यालय सुरु केले. बापूजीनी सातारा जिल्ह्यातील पाटण येथे सन १९५९ मध्ये 'गुरूजन अध्यापक विद्यालय' काढले.

त्यानंतर सन १९६० मध्ये बापूजींनी तासगांव, वडफगे, नळदुर्ग या ठिकाणी अध्यापक विद्यालये काढली. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना चांगले आणि योग्य प्रकारे शिक्षण द्यावयाचे असेल तर प्रशिक्षीत शिक्षकांची नितांत गरज आहे. हे ओळखून व मराठवाड्यातील वाढता शिक्षण प्रसार लक्ष्यात घेवून त्यांनी माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी सन १९६० मध्ये उस्मानाबाद येथे शिक्षण महाविद्यालय स्थापन केले. त्यावेळी सरकारी अनुदान नसल्याने बापूजींनी हे महाविद्यालय चालविण्यासाठी खूप परिश्रम घेतले. हे अध्यापक महाविद्यालय चांगले चालावे म्हणून हैद्राबाद राज्याचे शिक्षण संचालक डॉ. शेंदारकर यांची प्राचार्य म्हणून नेमणूक केली. बापूजींनी श्री. डी. एन्. कोल्हे वकील यांच्या सहकार्याने बीड येथे सन १९६५ मध्ये अध्यापक विद्यालय काढले. अशा रितीने बापूजींच्या शिक्षक प्रशिक्षण कार्याचा विस्तार वाढत गेला. त्यानंतर संस्थेने सन १९८४ मध्ये कराड येथे शिक्षण महाविद्यालय सुरू केले. व त्याच वर्षी तासगांव येथे महिलासाठी शिक्षण महाविद्यालय सुरू केले. ही दोन्ही प्रशिक्षण महाविद्यालये विना अनुदान तत्वावर चालू आहेत. [बापूजींनी स्थापन केलेल्या अध्यापक विद्यालयांची व महाविद्यालयांची यादी परिशिष्ट क्रमांक ६ मध्ये दिली आहे.]

## बापूजींनी शिक्षक प्रशिक्षणासाठी केलेले प्रयत्न -

१] बापूजींनी प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ८ अध्यापक विद्यालये काढली.

२] बापूजींनी माध्यमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ३ अध्यापक महाविद्यालये काढली.

३] नोकरीमध्ये असणाऱ्या शिक्षकांची सेवान्तर्गत प्रशिक्षणासाठी निवड केली.

४] शिक्षकांना प्रशिक्षण कालावधीसाठी कर्ज रुपाने आर्थिक सहाय्य केले.

५] शिक्षकांचे प्रशिक्षण दर्जेदार होण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील तत्सम प्रशिक्षण संस्थेशी संपर्क वाढविला.

६] शिक्षकांना माफक दराने कर्जे मिळण्यासाठी पतसंस्था स्थापन केली.

७] शिक्षकांना विचारांची देवाणघेवाण करता यावी म्हणून संस्कार शिबीरे आयोजित केली.

८] कांही शिक्षकांची परदेशी प्रशिक्षण शिबीरासाठी निवड केली.

शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्चशिक्षण, तंत्रशिक्षण, शिक्षक प्रशिक्षण या स्तरावर शिक्षण प्रसाराचे कार्य मोठ्या प्रमाणात केले आणि बहुजन समाजाला ख-या अर्थाने जागृत केले.

बापूजींच्या या शैक्षणिक कार्याविषयी प्राचार्य शिवाजीराव भोसले आपल्या ९ जून १९८८ रोजी बापूजी साळुंखे यांच्या ७० व्या जयंती निमित्त केलेल्या भाषणात म्हणतात.


> " शिक्षण क्षेत्रात बापूजी नावाचे आकाश अवतरलेले होते. आणि नवनवीन शाखांची निर्मिती त्या आकाशाखाली होत आहे. महाराष्ट्रामध्ये लोकांना विचार करण्याची सवय लावणारा एक संस्कार संपन्न ज्ञाता म्हणून बापूजींच्या कर्तृत्वाचा आलेख जेव्हा त्यांच्या पश्चात उभा राहातो तेव्हा त्यांच्या कार्याची भव्यताही शिक्षण प्रसाराच्या रुपाने जगापुढे उभी राहाते. "१३.

बापूजीनी महाराष्ट्रात एकूण २५९ विविध शाखा काढल्या व आपल्या शैक्षणिक कार्याची भव्यता सिध्द केली. [ बापूजींच्या शैक्षणिक कार्याचा विस्तार दर्शविणारा तक्ता परिशिष्ट-७ मध्ये दिला आहे. ]

पुढील पानावर श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या निरनिराळ्या शिक्षण शाखा दर्शविणारा नकाशा दिला आहे.

आकृती क्रं. ८




श्री स्वामी विवेकानंद
संस्थेच्या शिक्षण शाखा
दर्शविणारा नकाशा
(परिशिष्ट क्रं. ७)
माध्यमिक विद्यालये
तंत्र विद्यालये.
महाविद्यालये.
अध्यापक विद्यालये
व अध्यापक महाविद्यालये
महाराष्ट्र राज्य

६.७ बापूजी साळुंखे यांचे वसतिगृहासंबंधीचे कार्य -

स्व घरापासून दूर असलेले घर किंवा विद्यार्थ्यांवर सुसंस्कार घडविणारे केंद्र म्हणजे वसतिगृह. बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शाहू महाराजानी प्रथम महाराष्ट्रात वसतिगृह चळवळ सुरु केली. त्यानंतर अनेक शिक्षण प्रसारकांनी शाहू महाराजांच्या वसतिगृह चळवळीचे अनुकरण केले. कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, यांनी आपल्या शैक्षणिक कार्याची सुरुवात वसतिगृह स्थापनेनेच केली. त्याच कार्याची परंपरा बापूजीनी चालविली.

रयत शिक्षण संस्थेत नोकरी करित असताना रुकडी येथे बापूजीनी महात्मा गांधी वसतिगृह चालविले होते. तो अनुभव पाठिशी असल्याने स्वामी विवेकानंद संस्थेची स्थापना केल्यावर त्यांनी वसतिगृह काढण्याचे ठरविले.

वसतिगृह पार्श्वभूमी -

छत्रपती शाहू महाराजांनी सुरु केलेल्या वसतिगृह चळवळीमुळे, अनेक समाज सेवकांनी महाराष्ट्रात वसतिगृहे काढण्यास सुरवात केली. वसतिगृहातून चांगले सुसंस्कारीत विद्यार्थी बाहेर पडू लागले. त्यांना समाजात मान मिळू लागला, नोकऱ्या मिळू लागल्या साहाजिकच वसतिगृहाचे महत्व वाढले. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या वसतिगृह चळवळीतून नवीन पिढी निर्माण करण्याचे कार्य चालू होते. त्या कार्याची प्रेरणा बापूजीनी घेतली. या संदर्भात थोर शिक्षणतज्ञ जे.पी. नाईक यांनी छत्रपती विद्यार्थी वसतिगृहाच्या उद्घाटन समारंभावेळी काढलेल्या उद्गाराविषयी संभाजीराव पाटणे 'शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे' या पुस्तकात लिहतात.

" कर्मवीर भाऊराव पाटील यांचेच शिक्षण प्रसाराचे कार्य आणि वसतिगृह चळवळीचा वारसा बापूजी पुढे चालवित आहेत. "१४.

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार वेगाने सुरु झाला. त्यामुळे वसतिगृह चळवळीस चालना मिळाली. बापूजींनी सन १९५५ मध्ये कोल्हापूर, चाफळ, कराड या ठिकाणी वसतिगृहे सुरु करुन वसतिगृहे चळवळीच्या कार्याचा शुभारंभ केला.

१] छत्रपती वसतिगृह कोल्हापूर - चार हरिजन विद्यार्थ्यांच्या प्रवेशाने हे वसतिगृह सुरु झाले. सुरुवातीस या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या स्वयपाकासाठी बाई मिळाली नाही. त्यामुळे बापूजींच्या पत्नी सौ. सुशिलाबाईंनी स्वयंपाकाची जबाबदारी घेतली. या वसतिगृहात बापूजी स्वत: राहात असल्याने येथील विद्यार्थ्यांमध्ये त्यांनी मातापित्याचे वात्सल्य निर्माण केले. बापूजींनी या वसतिगृहाला शासनाकडून ९ एकर जमीन मिळविली. वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून श्रमदानाने ती जमीन उपजाऊ केली. भात, ऊस, केळी अशा पिकांचे उत्पन्न काढण्यास सुरु केले. अशा वसतिगृहयुक्त शेती मधून विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची आवड निर्माण करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. याच वसतिगृहात कोर्टाने निराश्रीत ठरवून दिलेल्या विद्यार्थ्यांना बापूजींनी प्रवेश देण्यास सुरुवात केली. अशा निराश्रीत विद्यार्थ्यांमधील परकेपणा, न्यूनगंड, व इतर अवगुणाचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न केला. त्या विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, आपुलकी व जिव्हाळ्याची भावना निर्माण करण्यासाठी सदोदित प्रयत्न केला. या विद्यार्थ्यांना बापूजींनी व त्यांच्या पत्नीने माता पित्याचे प्रेम दिले हा बापूजींचा एक वेगळा प्रयोग आहे.

२] <u>वांग व्हॅली वसतिगृह तळमावले</u> - सन १९५८ मध्ये तळमावले येथे बापूजींनी या वसतिगृहाची स्थापना केली. स्वामी विवेकानंद संस्थेचे या ठिकाणी माध्यमिक विद्यालय व महाविद्यालय आहे. हे वसतिगृह ग्रामीण भागात असल्याने तेथील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैर सोय दूर झाली. तेथील ग्रामस्थांच्या सहकार्याने बापूजींनी वसतिगृहासाठी दहा एकर जमीन मिळविली. या जमीनीतून विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने शेंग, भात, तूर, अशी पिके काढली जातात. त्यातून वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा खर्च भागविला जातो. या वसतिगृहातील मुलांना स्वतःची सर्व कामे स्वतःच करावी लागत असल्याने स्वावलंबन व श्रम प्रतिष्ठा विद्यार्थ्यांत निर्माण केली जाते. या वसतिगृहाबरोबर बापूजींनी सन १९५८ मध्ये इचलकरंजी , तारळे, कराड, तासगांव, परळी या ठिकाणी वसतिगृहे काढली.

वाढत्या शिक्षण प्रसाराबरोबर वसतिगृहाचे महत्व वाढू लागले. त्यामुळे बापूजींनी वसतिगृहे काढण्यावर भर दिला. सन १९५८ नंतर वसतिगृह संख्येत सतत वाढ होत गेली. सन १९६४ पर्यंत वसतिगृहांची संख्या १८ झाली. त्यानंतर बापूजींनी मागासलेल्या भागात वसतिगृहे काढण्याचे ठरविले.

३] <u>आश्रम छात्रालय वसतिगृह आशागड</u> - ठाणे जिल्हयातील या गांवी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सन १९६५ मध्ये वसतिगृह सुरु केले. या वसतिगृहासाठी १५ एकर जमीन बापूजींनी शासनाकडून मिळविली. त्यापैकी ८ एकर जमीनीमधून विद्यार्थी श्रमदानाने भात, नारळ, भाजीपाला ही पीके घेतली जातात. येथील विद्यार्थ्यांना दररोज सकाळी ७ ते ९ पर्यन्त शेतातील कामे करावी लागतात. वसतिगृहातील सर्व कामे विद्यार्थी सामुदायिकपणे करीत असतात. त्यामुळे या आदिवासी विद्यार्थ्यांना सहजीवनाचा लाभ मिळतो. तसेच शिक्षणाचा संपूर्ण कालावधी वसतिगृहातच

काढावा लागत असल्याने जीवनाचे संपूर्ण शिक्षण देणारी ही एक आदर्श प्रयोगशाळाच बनली आहे. या वसतिगृहातील प्रगतीमुळे बापूजींचे वसतिगृह चळवळीचे कार्य सतत वाढत गेले. त्यानंतर बापूजींनी बिल्लूर, रत्नागिरी, कापशी या मागासलेल्या भागात वसतिगृहे काढली.


बापूजींनी स्थापन केलेली वसतिगृहे

कोष्टक क्रमांक ६.३

| अ. नं. | वसतिगृहाचे नांव | वसतिगृह चालकाचे नांव. | विद्यार्थी संख्या | स्थापना सन |
|---|---|---|---|---|
| १. | छत्रपती वसतिगृह, कोल्हापूर. | व्ही. पी. जाधव | २५७ | १९५५ |
| २. | कमला नेहरू न्यू कॉलेज ऑफ एज्यु. वसतिगृह, कराड. | ऐ. के. कारंडे | ८० | १९५५ |
| ३. | समर्थ वसतिगृह, चाफळ. | के. पी. माळवे | ३४ | १९५५ |
| ४. | महात्मा गांधी वसतिगृह इचलकरंजी. | | २५ | १९५८ |
| ५. | छत्रपती वसतिगृह, तारळे. | आर. के. चोपडे | ३६ | १९५८ |
| ६. | वांगव्हॅली वसतिगृह, तळमावले. | ए. बी. माने | ३६ | १९५८ |
| ७. | संत तुकाराम मुलांचे वसतिगृह, कराड. | पी. एस्. गोरे | ९६ | १९५८ |
| ८. | संत तुकाराम मुलींचे वसतिगृह, कराड. | एस्. ए. पाटील | ६० | १९५८ |
| ९. | शिवाजी वसतिगृह, परळी | पी. एन्. कदम | ३० | १९५८ |
| १०. | भारती वसतिगृह, तासगांव. | जे. डी. शेटे | ६६ | १९५८ |
| ११. | गुरुजन वसतिगृह, पाटण. | एस्. ए. कुलकर्णी | ४० | १९५९ |
| १२. | मुलांचे वसतिगृह, गडहिंग्लज. | पी. एस्. माने. | ७० | १९५९ |
| १३. | पाराशर वसतिगृह, पारगांव. | वाय. के. माने | ३६ | १९६० |
| १४. | न्यू कॉलेज ऑफ एज्यु. वसतिगृह, तासगांव. | एस्. जी. चव्हाण. | ३५ | १९६० |
| १५ | हनुमान विद्यार्थी वसतिगृह, बंगलगी. | आर. एस. सातव | ३६ | १९६० |

आकृती क्र.
(कोष्टक क्रमांक ६.३)

श्री स्वामी विवेकानंद संस्थेची वसतिगृहे दर्शविणारा नकाशा.



| अ. नं. | वसतिगृहाचे नांव | वसतिगृह पालकाचे नांव. | विद्यार्थी संख्या | स्थापना सन |
|---|---|---|---|---|
| १६. | श्री. उत्तरेश्वर वसतिगृह, केम | एस्. एन. देवकर | ३० | १९६१ |
| १७. | कै. ज्ञानोजीराव साळुंखे वसतिगृह, पाटण. | बी. आर. पाटील | ४० | १९६४ |
| १८. | छत्रपती शिवाजी वसतिगृह, भोर. | डी. जी. शिंदे | २६ | १९६४ |
| १९. | पो. बेसिक व आश्रम, आशागड. | एस्. एस. स्मनूर | १३६ | १९६५ |
| २०. | गुरु बश्वेश्वर वसतिगृह, बिल्लूर. | एस्. एच. शिंगुरी | ४२ | १९६७ |
| २१. | मुलींचे वसतिगृह, गडहिंग्लज. | एस्. बी. परिट | २४ | १९६९ |
| २२. | विवेकानंद वसतिगृह, रत्नागिरी. | ए. जी. हसबे | ६० | १९७४ |
| २३. | संत गाडगेबाबा वसतिगृह, कापशी. | ए. डी. सावंत | २४ | १९७५ |

बापूजींनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी केलेले प्रयत्न.

१] <u>वसतिगृहातील आहार</u> -

वसतिगृहातील मुलांना साधा पण पौष्टिक आहार देण्यावर बापूजींचा भर होता.

२] <u>वसतिगृहातील व्यायाम</u> - वसतिगृहातील मुलानी दररोज कोणतातरी व्यायाम केला पाहिजे. याबाबत बापूजींची सक्ती होती. ते दररोज विद्यार्थ्यांकडून पळणे हा व्यायाम करवून घेत. तसेच पोहणे, कुस्ती यासारखे व्यायाम ही मुलांना करण्यास सांगत.

३) विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव -

वसतिगृहातील विद्यार्थ्यांमध्ये सभाधीटपणा येण्यासाठी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करून त्यामध्ये विद्यार्थ्यांना भाषणे करण्यास बापूजींनी चालना दिली. नेतृत्वगुणाची वाढ होण्यासाठी मुलांचे मंत्रीमंडळ तयार करून त्यांच्यावर जबाबदारीची कामे सोपविली. विद्यार्थ्यांमध्ये श्रमाची आवड निर्माण व्हावी म्हणून वसतिगृहातील शेतीवर कामे करण्यास उत्तेजन दिले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त व नियमीतपणा यासारख्या सवयी निर्माण केल्या. वसतिगृह माध्यमातून श्रम आणि ज्ञान यांनी युक्त असा नागरीक घडविण्याचा प्रयत्न केला. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना काम करून शिकण्याची संधी दिली. वसतिगृहात सर्व जातीची धर्माची मुले एकत्र राहत. एकत्र मिळून कामे करीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना सहजीवनाचा लाभ मिळे. बापूजींनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जीवनावश्यक सर्व कामे स्वत: करण्याच्या सवयी निर्माण करून दिल्या. या संदर्भात डॉ. एस.एस. भोसले " आपल्या "महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा" या पुस्तकात असे लिहतात की,

> "बापूजींनी चालविलेल्या वसतिगृहे म्हणजे विद्यार्थ्यांच्या जीवनशिक्षणाची प्रयोग शाळा असून उत्तम प्रकारची संस्कार केंद्रे आहेत." १५.

वसतिगृहात सर्व जातीचे विद्यार्थी एकत्र राहात असल्यामुळे त्यांच्यामध्ये एकमेकाविषयी आपुलकीची भावना वाढली आणि या वातावरणामुळे सामाजिक एकता निर्माण होण्यास मदत झाली.

६.८ समारोप -

शिक्षण महर्षि डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्रामध्ये माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, या शैक्षणिक स्तरावर शिक्षण प्रसाराचे कार्य केले. तसेच वसतिगृहासंबंधी त्यांनी जे कार्य केले त्याचा आढावा या प्रकरणात घेतला आहे. पुढील प्रकरणात निष्कर्ष व शिफारशी दिल्या आहेत.

::::::::

## संदर्भ


१] मा. गो. माळी : शैक्षणिक प्रश्न पुनर्रचना आणि राष्ट्रविकास. पुणे, निलकंठ प्रकाशन, १९७७, पृष्ठ क्रमांक १७.

२] बी. डी. पाटील : डॉ. बापूजी साळुंखे व्यक्ती, कार्य आणि आठवणी. बेळगांव, मनिषा प्रकाशन, १९८६, पृष्ठ क्रमांक-४२.

३] राधाकृष्णन् : विद्यापीठ शिक्षण आयोग अहवाल. सिमला, व्यवस्थापक प्रसिध्दी विभाग, भारत सरकार, १९५१, पृष्ठ क्रमांक: ३३.

४] झाकीर हुसेन : भारतातील शैक्षणिक पुनर्रचना दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट, १९८३, पृष्ठ क्रमांक ५१.

५] गजानन सुर्वे : परमपूज्य बापूजी साळुंखे व्यक्ती आणि कार्य. कोल्हापूर, बापूजी साळुंखे षष्ठ्यब्दिपूर्ती समिती, १९८१, पृष्ठ क्र. १५८

६] गजानन सुर्वे : तत्रैव पृष्ठ क्र. १०७.

७] सौ. लिला पाटील : "आजचे शिक्षण आजच्या समस्या" पुणे, श्री विद्या प्रकाशन, १९७१, पृष्ठ-क्र. ८६

८] सौ. लिला पाटील : तत्रैव पृष्ठ क्र. १६७.

९] गजानन सुर्वे : उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र. १०७.

१०] मा. गो. माळी : "आधुनिक शिक्षणाच्या समस्या"
कोल्हापूर, अजब पुस्तकालय, १९८३,
पृष्ठ क्रमांक -९०.

११] ना. वि. पाटणकर : नवशिक्षण प्रवाह आणि प्रवृत्ती.
पुणे, ज्योति प्रकाशन, १९६१,
पृष्ठ क्र. २१.

१२] चित्रा नाईक : "शिक्षण आणि समाज" अंक ३ रा
डिसेंबर १९६५ , पुणे इंडियन इन्स्टिट्यूट
ऑफ एज्युकेशन १९६५ पृष्ठ क्र. ५६

१३] अभयकुमार साळुंखे : संस्कृती अंक ६ वा [१९८७-८८]
कोल्हापूर, स्वामी विवेकानंद शिक्षण
संस्था प्रका. १९८८ पृष्ठ क्र. १६.

१४] संभाजीराव पाटणे : शिक्षण महर्षि बापूजी साळुंखे
सातारा सुशिल प्रकाशन, १९८२
पृष्ठ क्र. ३४.

१५] गजानन सुर्वे : उपरनिर्दिष्ट पृष्ठ क्र. ५१४.


:::::::::::::